The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# लोककला प्रकार आणि कीर्तनाचे प्रायोगिक स्वरूप

प्रा. डॉ. न. ब. कदम
मराठी विभागप्रमुख, छत्रपती शाहू महाविद्यालय, लासूर स्टेशन ता. गंगापूर जि. औरंगाबाद.

'कला' म्हटल की आपल्याला नाटय,संगीत, नृत्य, चित्र व शिल्प यासारख्या ललित कलांचा बोध होतो. परंतु या पेक्षा अनेक अज्ञात असणारे कलाप्रकार लोक परंपरेतून, लोकसंस्कृतीतून आकारास आलेले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे कलाप्रकार म्हणजे गोंधळ, जागरण, दशावतार, दंडार, बोहाडा, सोंगीभजन, तमाशा, भारूड, कीर्तन यासारखे कलाप्रकार सांगता येतात. हे सर्व कलाप्रकार लोकजीवन शैलीतून विकसित झालेले असल्याने त्यांना लोककलाप्रकार या नावाने ओळखले जाते. संगीत, नृत्य आणि नाटय यांचे एकत्रित उपयोजन अनेक लोककला प्रकारात केल्याचे दिसते. लोककला प्रकारांचा शोध घेण्याचे काम डॉ. रा. चिं. ढेरे, डॉ. प्रभाकर मांडे यासारख्या अभ्यासकांनी केले आहे. 'भारतीय रंगभूमीच्या शोधात' हे डॉ. रा. चिं. ढेरे यांचे पुस्तक आणि 'लोकरंगभूमी'हे डॉ. प्रभाकर मांडे यांचे पुस्तक हे दोन्ही पुस्तके लोककला प्रकाराच्या बाबतीत दिशादर्शक आहेत. लोककला ही संकल्पना तशी व्यापक स्वरूपाची आहे. या ठिकाणी लोककला प्रकारांचा विचार करतांना फक्त प्रयोग हा धागा डोळयासमोर ठेवलेला आहे. ज्या कला प्रकारांना प्रायोगिक मूल्य लाभलेले आहे अशाच काही लोककला प्रकारांची निवड करून अभ्यासाच्या काही नव्या दिशा सुचित केल्या आहेत.

लोककलेच्या बाबतीत प्रयोग हा शब्द सादरणीकरण या अर्थाने वापरला जातो. प्रयोग सादर करतांना कलावंताची भूमीका त्या ठिकाणी महत्त्वाची असते. कलावंत हा प्रायोगिक लोककलेतील मुख्य घटक असतो. कलावंतांनी सादर केलेल्या प्रयोगाचा आस्वाद घेण्यासाठी त्याठिकाणी उपस्थित असणारा प्रेक्षक किंवा रसिक वर्ग हा कला प्रयोगाच्या यशस्वीतेत महत्त्वाची भूमीका बजावत असतो. याची दुसरी बाजू म्हणजे कलावंत आपल्या कलेच्या माध्यमातून रसिकाच्या अंतकरणातील स्थिर असणा-या स्थायी भावास आस्वाद योग्य करत असतो. कलावंत आणि रसिक यांच्यामध्ये असणारे सहाचर्य हे परस्पर पूरक आणि एकमेकांवर अवलंबून असते. कोणताही लोककला प्रकार असो त्यात कलाकारांचा त्यांच्या आस्वादकांशी, रसिकांशी प्रत्यक्ष संबंध होत असतो. एवढेच नव्हे तर रसिक हा त्या त्या कलाप्रकाराच्या यशस्वितेच्या प्रक्रियेत सहभागी असतो.

प्रत्येक कलाप्रकारच्या निर्मितीमागची भूमीका एकसारखीच आहे असे आपल्याला म्हणता येत नाही. त्यामध्ये निराळेपण असल्याचे लक्षात येते. वासुदेव, पोतराज, मसनजोगी, पांगूळ, बाळसंतोष यासारखे लोककलावंत विशिष्ट देवतांचे उपासक असून त्यांचा समावेश लोक संस्कृतीच्या उपसकात केला जातो. डॉ. रा. चिं. ढेरे यांचे 'लोक संस्कृतीचे उपासक' हे पुस्तक या संदर्भात उल्लेखनीय स्वरूपाचे आहे. देवदेवतांना आवाहन करणे, कथागीते गाऊन लोकरंजन करणे तसेच लोकांना आपल्या परंपरेची, संस्कृतीची जाणीव करून देणे यासारखी कामे हे उपासक करत आलेली आहेत. उपासक आणि लोकरंजनकार यांचा संचार आजही ग्रामीण भागात असल्याचा दिसतो. लोकांनी स्वखुशीने दिलेल्या दानावर या लोक संस्थांची उपजीविका चालते. संतांनी रूपकाची परिभाषा वापरून या उपासकांच्या व रंजनकारांच्या कार्याचा परिचय आपल्या अभंग वाङ:मयातून करून दिलेला आहे. विशेष करून संत एकनाथांच्या भारूडात याचा प्रत्यय

येतो. “अध्यात्माचा विचार लोकांमध्ये प्रसृत करण्यासाठी एकनाथांनी रंजन करणाऱ्या या लोकांच्या कलांचा, त्यांच्या वाद्यांचा उपयोग करून घेतला. त्यांची हिंदी भाषाही एकनाथांनी आपल्या भारूडरचनेत आणली. चंदनाची उटी लावणारा, कुंडले घालणारा, पायात घाग-या लेऊन, टाळ-मृदुंगाच्या साथीवर नाचणारा खेळिया एकनाथांनी रंगविला. लोकसंस्थांवर आधारित भारूडांची रचना एकनाथांनी केले”(1) हे डॉ. सुमती देशपांडे यांनी केलेले प्रतिपादन विचारात घेण्यासारखे आहे. लोक कलेशी संबंधीत असणा-या संत वाङ:मयातील रूपकांचा विचार, प्रयोग मूल्याच्या अंगाने स्वतंत्र पध्दतीने करता येऊ शकतो.

लोककलावंत आणि त्यांच्या कलेचा प्रयोग एक सारखा असल्याचा दिसत नाही. वासुदेव, पांगूळ, पोतराज, मसनजोगी, बाळसंतोष, चित्रकथी, भाट, मुंढा इत्यादी सर्व कलांवंताच्या कलेचा समावेश एकपात्री लोककला प्रयोगात करता येतो. तसा कीर्तन, भारूड, गोंधळ, जागरण, दशावतार, तमाशा इत्यादी लोककला प्रयोगांचा अंतर्भाव एकपात्री लोककलेमध्ये करता येत नाही. एकपात्री लोककला प्रयोगाचे एक उदाहरण म्हणून याठिकाणी वासुदेवाचे देत आहे. वासुदेवाच्या प्रयोगाची सुरूवात सकाळच्या प्रसन्न वातावरणात होते. घराच्या समोरचे अंगन किंवा रस्ता हे त्याच्या प्रयोगाचे ठिकाण हा प्रयोग म्हणजे एक प्रकारचे पथनाटयच होय. डॉ. प्रभाकर मांडे यांचे विधान या ठिकाण विचारत घेण्यासारखे आहे. त्यांच्या मते “पोतराज किंवा भूत्या त्याप्रमाणे वासुदेव यांचे रस्त्यावरील नृत्यनाटय ही पथनाट्येच असतात”(2) वासुदेव हाप्रत्येक घरोघरी, रस्त्यावर कलाप्रयोग सादर करून देवाच्या नावाने दान मागतो. वासुदेवाची ओळख ही त्याच्या पोशाखा वरून होते. धोतर, अंगात जुन्या पध्दतीचा घोळदार अंगरखा, गळयात उपरणे, डोक्यावर मोरपिसांची शंखाकार टोपी, उजव्या हातात टाळ, डाव्या हातात चिपळया, काखेत झोळी पायात बांधलेले घुंगराचे चाळ आणि कमरेच्या शेल्यात खोचलेली बासरी हा वेष परिधान करून टाळ, चिपळयांच्या निनादात देवतांच्या नमनांने आपल्या कलाप्रयोगाला सुरूवात करतो.

दान पावलं, दान पावलं
पंढरपूरच्या विठोबारायाला
तुळजापूरच्या भवानी मातेला
देऊळ गावाच्या बालाजी देवाला

हे म्हणत असतांना हातातील टाळ आणि चिपळयांचा ठेका, विशिष्ट पध्दतीची लय, नृत्यपूर्ण पदन्यास, गीत म्हणण्याची विशिष्ट प्रकारची ढब आणि शेवटी आशीर्वाद देऊन रसिक प्रेक्षकांची जिंकून घेतलेली मने हे वासुदेवाच्या प्रयोगाचे खरे यश आहे. या प्रयोगाचा आस्वाद घेणारा रसिक म्हणजे ज्याच्या द्वारी भिक्षा मागितली जाते. त्या घरची लहान थोर माणसे हेच खरे वासुदेवाच्या कलाप्रयोगाचे रसिक होत.

लोककला प्रकारामध्ये गोंधळ, जागरण दशावतार, बोहाडा यांचा उल्लेख विधिनाटय म्हणून केला जातो. त्याचे कारण या कला प्रकारात अगोदर विधीला महत्त्व असते आणि नंतर नाटयात्मक प्रयोग सादर केला जातो. विधिनाटय सादरीकरणामागे लोकमानस, लोकपरंपरे विषयी असणारी श्रध्दा विशेष करून कार्यरत असल्याची दिसते. गोंधळ या विधिनाटयाचे स्वरूप प्रयोगाच्या अंगाने जाणून घ्यावयाचे झाले तर महाराष्ट्रात गोंधळ घालण्याची परंपरा फार पूर्वीपासून प्रचलित असल्याची दिसते. घरात एखादे शुभकार्य घडल्यानंतर किंवा कुळाचार म्हणून गोंधळ घतला जातो. तो विशेषकरून तुळजापूरची देवी व माहूरची रेणूकामाता यांचा घातला जातो. गोंधळ सादर करतांना मुख्य गोंधळी आणि त्यांचे वादक किंवा साथीदार

यांचा समावेश असतो. त्यामुळे गोंधळ या कला प्रकाराचा समावेश एकपात्री प्रयोगात करता येत नाही. मुख्य गोंधळयाची वेषभूषा साथीदारापेक्षा वेगळी असते डोक्यावर विशिष्ट प्रकारचे पागोटे, अंगात घोळदार झगा, धोतर, गळयात कवडयाची माळ, काखेत भंडा-याची पिशवी, नृत्याच्या प्रसंगी डौलदार झग्याचा काट धरून नाचण्याची विशिष्ट पध्दत, संभळ, तुणतुणे, झांज, कडी या वादयांच्या साथीवर देवीची गाणी म्हणण्याची विशिष्ट ढब हे गोंधळयाच्या वेषभूषेचे व कलात्मक आविष्काराचे वेगळे आकर्षण असते. मुख्य गोंधळयाला साथ देणारे साथीदार प्रसंगानुरूप सहज व स्वाभाविकपणे आपली भूमिका बदलतात व गोंधळाचा प्रयोग नाटयात्मक पध्दतीने सादर करतात.

गोंधळ या विधिनाटयात पूर्वरंग आणि उत्तरंग असे मुख्य दोन भाग असतात पूर्वरंगात देवीच्या उपासनेतील पूजाविधी व देवीची गाणी यांचा समावेश असतो. त्यात सर्वप्रथम देवता प्रतिष्ठापना आणि पूजा झाली की नंतर गण म्हटला जातो. गण, गौळण झाल्यानंतर सर्व देवतांना गोंधळाला येण्यासाठी आवाहन केले जाते. आवाहन गीत साधे, सरळ, सुटसुटीत असते नंतर नमनगीते गायिली जातात. गोंधळात नमनगीते किती असावीत याबाबतीत तसा कोणताही संकेत नाही. गोंधळाच्या पूर्वरंगानंतर उत्तररंग सुरू होतो. त्यात पुराणातील किंवा लोक परंपरेने चालत आलेली एखादी कथा गद्य-पद्यात्मक स्वरूपात साभिनय सादर केले जाते. शेवटी आरती होते आणि गोंधळाचा कार्यक्रम संपल्या जातो. गोंधळाच्या प्रयोगाला आस्वाद घेणारा रसिक सर्वसाधारणपणे लोकपरंपरेचे, संस्कृतीचे जतन करणारा, भावनिक व श्रध्दायुक्त अंतःकरणाचा असतो.

लोकनाटयालाच आपण 'तमाशा' असे म्हणतोत. विशेष करून जत्रेत / यात्रेत तमाशाचा प्रयोग सादर केला जातो. तमाशा करून दाखविणा-या मंडळींना तमासगीर असे म्हणतात. सात आठ जणांचा एकसंच तमाशात असतो. या संचाला 'फड' असे म्हणतात. फडाचा जो मुख्य असतो त्याला सरदार किंवा नाईक म्हटले जाते. नाईक म्हणजे तमाशातील सर्व नाटय दर्शनाचा नायक असतो. याशिवाय नायिकेची भूमिका करणारा स्त्री वेशधारी नाच्या किंवा नाची स्त्री असते. शब्द कोटया करून हास्य निर्मिती करणारा सोंगाडया असतो. सरदार, सोंगाडया व नाची या त्रयीवर तमाशाचे यश अवलंबून असते. याशिवाय तमाशामध्ये ढोलकी व तुणतूणे वाजविणारे दोन साथीदार असतात आणि मागे उभे राहून जी जी म्हणणारे सूर ओढणारे सुरते किंवा झिलकारी असतात असे एकूण सात ते आठ लोक तमाशात वेगवेगळी भूमिका पार पाडतात. लोककलावंतांच्या संख्येत आज अधिक भर पडलेली दिसते. काळानुरूप लोकनाट्यात बदल झालेला दिसून येतो.

तमाशाचे प्रायोगिक स्वरूप लक्षात घेताना तमाशाचे पूर्वरंग आणि उत्तररंग असे दोन भाग पडतात पूर्व रंगाची सुरुवात गणाने होती कार्यक्रमात कोणतेही विघ्न येऊ नाही म्हणून सर्वप्रथम गणेशाला वंदन केले जाते. पठ्ठे बापूरावांच्या गणाचे उदाहरण या ठिकाणी देत आहे.

आधी गणाला रणी आणा |
नाहीतर रंग पुन्हा सुना सुना|
धन्य शारदा ब्रम्हकन्या |
घेऊन येईल रुद्र विणा ||

गणा नंतर नाच्या किंवा नाची ढोलकी, तुणतुण्याच्या नादावर आपले नृत्य करते. त्यानंतर गवळण होते. गण, गवळण झाल्यानंतर रंगबाजी सुरू होते. यालाच संवादणी किंवा बतावणी असेही म्हणतात. हा

एक छोटा फार्सच असतो. यात एखादे छोटेसे कथानक निवडून त्यात घटनेची गुंतागुंत करून खऱ्याचे खोटे आणि खोटयाचे खरे केलेले असते. बतावणी झाल्यावर लावणी म्हटली जाते. नृत्य, नाटय, संगीत आणि ढोलकीचा ताल यामुळे लावणीचे आकर्षण वेगळे ठरते. हा तमाशाच्या पूर्वरंग रसिकाच्या मनाला आकर्षित रंजन करणारा असतो. पूर्वरंगानंतर उत्तररंगात वगनाटय असते. सर्वसाधारणपणे लोकांची अभिरुची लक्षात घेऊन लोकनाटयाचे सादरीकरण केले जाते. अन्य लोककला प्रकारापेक्षा तमाशाचा रशीक वर्ग अधिक असतो. डॉ. विश्वनाथ शिंदे म्हणतात “साधारणत: संबंधित सर्व मानवी घटकांना जवळीक वाटेल असेच लोकनाटयाचे भावनिक स्वरूप असते. वैयक्तिकतेपेक्षा सामाजिकतेकडे या लोकनाटयाचे अधिक लक्ष असते”(3). त्यामुळे तमाशा ही लोककला जनसामान्यात आजही टिकून राहिली आहे.

कीर्तन हा एक नवविधा भक्तीपैकी दुसऱ्या क्रमांकाचा प्रकार आहे. कीर्तनाला प्रायोगिक मूल्य प्राप्त करून देण्याचे काम संत नामदेवांनी केले आहे.

नाचू कीर्तनाचे रंगी |
ज्ञान दीप लावू जगी||

अशी प्रतिज्ञा संत नामदेवांनी केली आहे. कीर्तना मागची भूमिका लक्षात घेतली तर विधिनाटयापेक्षा कीर्तनातील नाटयात्मकताही भक्ती व अध्यात्माशी एकरूप झालेली दिसते. संत ज्ञानदेवांच्या शब्दात सांगायचे झाले तर

तरी कीर्तनाचेनि नटनाचे | नाशिले व्यवसाय प्रायश्चिताचे |
जे नामचि नाही पापाचे | ऐसे केले ||ज्ञा.अ.9 ओ 97

ही वारकरी कीर्तनामागची नाटयात्मक भूमिका अध्यात्माशी नाते प्रस्थापित करणारी आहे. कीर्तन परंपरेमध्ये वारकरी कीर्तनाप्रमाणेच हरिदासी, रामदासी, गाडगे महाराजांचे कीर्तन यासारखे प्रकार असल्याचे दिसतात. या प्रकारातही प्रायोगिकदृष्टया निराळेपण जाणवते. उदाहरणार्थ हरिदासी कीर्तनाप्रमाणे वारकरी कीर्तनात पूर्वरंग आणि उत्तररंग असा भेद नाही. गाडगे महाराजांच्या कीर्तनात “गोपाला गोपाला देवकी नंदन गोपाला” असे भजन म्हटले जाते. तसे वारकरी कीर्तनात म्हटले जात नाही. वारकरी कीर्तनाचे प्रायोगिक स्वरूप यापेक्षा निराळे आहे.

वारकरी कीर्तन हे मठ, मंदीर, दिंडी, नामसप्ताह यासारख्या ठिकाणी केले जाते. ही एक प्रकारे वारकरी कीर्तनाची रंगभूमी होय. कीर्तनाच्या प्रयोगाची सुरुवात संप्रदायातील एखादा वारकरी ‘राम कृष्ण हरी’ या भजनाने करतो. ‘सुंदरते ध्यान’ हा अभंग चालीवर म्हणून तो ‘विठोबा रखुमाई’ हे भजन घेतो. कीर्तनकार आल्यानंतर वारकरी आपल्या गळ्यातील वीणा कीर्तनकाराकडे देतो. कीर्तनकार त्या वारकऱ्याचे व वीण्याचे दर्शन करून ‘राम कृष्ण हरी’ या भजनाने कीर्तनाची सुरुवात करतो. ‘रूप पाहता लोचणी| सुख झाले वो साजणी || हा रूपाचा अभंग झाल्यानंतर पुन्हा ‘राम कृष्ण हरी’ हे भजन घेऊन कीर्तनकार निरूपणासाठी एका कोणत्यातरी संतांचा अभंग सरळ चालीवर म्हणतो. अभंग झाल्यानंतर ‘विठोबा रखुमाई’ हे भजन घेतले जाते. दोन टाळकरी निरूपणासाठी घेतलेला अभंग एका विशिष्ट चालीवर म्हणतात चाल झाल्यानंतर कीर्तनकार ‘विठ्ठल विठ्ठल’ हे भजन घेतो. ‘पुंडलिकावरदेव हरी विठ्ठल’ हा जयघोष करून कीर्तनकार आपल्या गळ्यातील उपरण्याने आपली कंबर बांधतो आणि निरुपणासाठी घेतलेला अभंग सरळ म्हणून त्यावर तो स्वतंत्र पद्धतीने भाष्य करतो. प्रसंगानुरूप टाळकरी कीर्तनकाराच्या निरूपणाला अन्य संतांच्या वचनांची पुष्टी देतात. मध्यांतरी ‘विठोबा रखुमाई’ हे भजन घेतले जाते. शेवटी भैरवी रागात चाल

म्हटली जाते आणि आरती नंतर कीर्तनाचा कार्यक्रम संपल्या जातो. 'कीर्तन' या प्रसारमाध्यमाचे नाते परमेश्वर भक्तीशी आहे हे जरी खरे असले तरी लोकशिक्षणाचे कलात्मक माध्यम म्हणून कीर्तनाकडे बघता येते. या संदर्भात डॉ. यशवंत पाठक यांची भूमिका लक्षात घेण्यासारखी आहे. त्यांच्या मते "कीर्तन हे केवळ भागवत धर्माचे अंग न राहता जीवनात सदाचरणाची संस्कार करणारी लोकशाळा बनली व कीर्तनकार लोकशिक्षक झाले" "(4). ही व्यापक व सर्वसमावेशक भूमिका कीर्तन प्रयोगाच्या मागे असल्याची लक्षात येते. कीर्तनाच्या प्रयोगाचा आस्वाद घेणारा रसिक वर्गही भक्ती, ज्ञान, नीती यामध्ये अभिरुची दर्शविणारा असतो.

एकूणच लोककला प्रकारांचा प्रायोगिक अंगाने विचार केल्यानंतर असे लक्षात येते की, काही लोककला प्रकार एकपात्री प्रयोग करणारे आहेत तर काही प्रकार बहुपात्री प्रयोग करणारे आहेत. कीर्तनाचे प्रायोगिक स्वरूप हे टाळकरी, वीणेकरी, गायक, मृदंगवादक यांच्यावर अवलंबून असते म्हणून कीर्तन हा बहुपात्री प्रयोग आहे. संत तुकाराम म्हणतात.

लावुनी मृदंग श्रुति टाळ घोष| सेवू ब्रम्हरस आवडीने ||

हे कीर्तनाच्या प्रायोगिकतेचे निराळेपण इतर लोककला प्रकारापेक्षा उठून दिसणारे आहे. आजही कीर्तनाची लोकप्रियता कमी झालेली दिसत नाही.

संदर्भ ग्रंथ -1). डॉ. सुमती देशपांडे, मराठी हिंदी भारुड काव्य एक अभ्यास, दिलीप राज प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 2005, पृ. क्र. 62.

2). डॉ. प्रभाकर मांडे, लोक रंगभूमी, मधुराज पब्लिकेशन्स, पुणे, नवी आवृत्ती 2007, पृ. क्र. 331.

3). डॉ. विश्वनाथ शिंदे, लोकधाटी अवलोकन आणि विचार, सुगावा प्रकाशन, पुणे, प्रथम आवृत्ती 1991 पृ. क्र.2.

4). डॉ. यशवंत पाठक, नाचू कीर्तनाचे रंगी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती 2023, पृ.क्र.63.